जा.क्र./नसका/स्थायी/CR-११०/2015.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- २४.११.२०१५

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण -2 मधील नियम क्र.3 (अ) अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र 3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दिनांक २७.११.२०१५ रोजी दुपारी ३.००** वाजता नांवाशमनपा स्थायी समिति सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.

प्रति,

**श्री/श्रीमती** ______________________

सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## विषय क्रं.१

दिनांक ०१.१२.२०१४, दि. ०९.१२.२०१४ विशेष सभा, दि.११,१२,२०१४, दि.२३.०२.२०१५, दि.२५.०२.२०१५, दि.१६.३.२०१५, (अंदाजपत्रकीय विशेष सभा), दि. ११.०५.२०१५, दि.२७.७.२०१५, दि.३०.०७.२०१५ व दिनांक २१.१०.२०१५ रोजी दि.६.११.२०१५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

## विषय क्रं.२

**काळेश्वर पम्प हाऊस येथे ९०० एमएम पाईप लाईनवर एनआरव्ही बसविणेसाठी तिन वेळेस निविदा सुचना ऑनलाईन मार्फत प्रसिध्द करण्यात आली त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे काळेश्वर पंपिंग स्टेशन केंद्राच्या जलवाहीनीवर एनआरव्ही (**Non Return Valve**) अस्तीत्वात असणे आवश्यक आहे.** काळेश्वर येथून पाण्याच्या उपसा करुन असदवन व सिडको-वाघाळा जलशुध्दीकरण केंद्राकडे पाठविण्यात येते. परंतु आकस्मिकरित्या विपुल प्रमाणात पाणी पुरवठा चालु असतांना खंडीत झाला, तर सदरील पाणी काळेश्वर केंद्राकडे परत येते. या प्रक्रियेत प्रचंड प्रमाणात बॅक प्रेशर निर्माण होऊन मोटासरीवर विपरीत परिणाम होतो. मोटारी व पंपिंग व्यवस्था क्षमीग्रस्त होण्याची तक्रार उदभवते ३७५ एचपी पम्पाने पुरवठा होणारे पाणी त्याच शक्तीनुसार परत केंद्राकडे वळत असल्याने प्रचंड प्रमाणात घातक शक्तीपूर्ण प्रभाव पम्पस वर होतो.

करिता ईच्छूक एजन्सी **इंद्रजा कन्स्ट्रक्शन उस्मानाबाद** यांच्याकडून प्रस्तावित कामात प्रचलीत जिल्हा दरसुची नुसार सालसन २०१२-१३ च्या दराप्रमाणे **रुपये १०,३०,०००/-** खर्च अपेक्षीत आहे. कामाची तातडी, गरज व आवश्यकता पाहता संबंधीत इजन्सी मार्फत सदरील काम करुन घेण्यात आले आहे. त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता सदरचा प्रस्तजाव स्थायी समिती समोर मानयतेस्तव सादर.

## विषय क्रं.३

**नांदेड वाघाळा शहर महानगरालिका हद्दीत स्नेहनगर येथील मा. आयुक्त यांच्या निवासस्थानाची दुरुस्तीचे काम करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ३,७९,६००/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **माझा कंन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर माझा कंन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ३,७९,६००/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव मुं. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

## विषय क्रं.४

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३-क व ड अन्वये नोंद घेणे बाबत.**

मनपा आदेश क्रं. नावाशमनपा/पापुजनि/१०३९५/१५ दि.१०.११.२०१५ आदेशानवये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत झोन क्रं. डी सिडको भागा करिता ड्रेनेज साफसफाईसाठी मजुर पुरवठा करण्याचे कामासाठी कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा वम लनिस्सारण यांनी

सादर केलेला असुन त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक २६.१०.१५ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरील कामासाठी मजुर पुरवठा करण्यासाठी श्री बी.जी. भास्करे यांच्या मार्फत पुरवठा करुन त्या भागातील मलनिस्सारण व्यवस्था सुव्यवस्थीत करण्यात आली असुन त्यासाठी खालील प्रमाणे खर्च झाला असून झालेला खर्चास देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात येते तसेच यावरील खर्च बी.जी. भास्करे गुत्तेदार यांच्या नावे अदाई करण्याची मान्यता प्रदान करण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

| मजुरांनी कामे केलेला महिना | मजुरांची संख्यां | मजुरांनी काम केलेले दिवस | प्रति पुरुष मजुरी रुपये | एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| दिनांक. २१.०७.१५ ते २०.०५.१५ | १२ | २६ | ३०० | ९३,६००/- |
| दिनांक. २१.०८.१५ ते २०.०९.१५ | २२ | २७ | ३०० | १,७८,२००/- |
| दिनांक. २१.०९.१५ ते २०.१०.१५ | २२ | २७ | ३०० | १,७८,२००/- |
| दिनांक. २१.१०.१५ ते २०.११.१५ | २२ | २७ | ३०० | १,७८,२००/- |

## विषय क्रं.५

नावाशमनपा हद्यीतील **स्टेडीयम परिसरात स्विमींग पुल त संपवेल पर्यंत पाईपलाईन करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व प अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ११,२७,०००/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री साई कन्सट्रक्शन नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले.कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री साई कन्सट्रक्शन नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ११,२७,०००/- यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समीती समोर सादर.

## विषय क्रं.६

नावाशमनपा हद्यीतील **श्रावस्तीनगर भागातील बौध्द विहारा समोरी सी.सी. रस्ता** करण्यासाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व प अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ५,९८,४००/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **विलायत खान करीम खान नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **विलायत खान करीम खान नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च **रुपये ५,९८,४००/-** यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समीती समोर सादर.

## विषय क्रं.७

नावाशमनपा **मुख्य इमारतीतील विविध कार्यालयातील खिडक्याच्या परदयाची दुरुस्ती करणेसाठी** या विभागाचे कनिष्ठ अभियंता व प अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ३६,०७५/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री नितीन एन. भालेराव कंत्राटदार नांदेड** यांचेकडुन करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर **श्री नितीन एन. भालेराव कंत्राटदार नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च **रुपये ३६,०७५/-** यास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समीती समोर सादर.

## विषय क्रं.८

**महाराष्ट्र दिनाचा ५५ वा वर्धापण दिन साजरा करणेसाठी मुख्य शासकिय ध्वजारोहनाचा कार्यक्रम दिनांक ०१.०५.२०१५ रोजी** पोलीस मुख्यलय नांदेड येथे साजरा करण्यात आला असुन सदर ठिकाणी कार्यक्रमा करिता व अति महत्वाच्या व्यक्ती करिता आसन व्यवस्था जसे मंडप, साईडींग, ग्रीन व रेड कार्पेट, चटई, सोफासेट, चेअर टिपॉय इत्यादीची व्यवस्था श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांनी करुन सदर कामाचे रुपये १,९८,७६५/- चे देयक दाखल केले आहे. करिता वरील प्रमाणे **रुपये १,९८,७६५/-** च्या खर्चास मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

## विषय क्रं.९

कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/लेवि/वेतन/९८८३/१५ दिनांक ३०.१०.२०१५ **अन्वये श्री संजय कुर्वे (प्रतिनियुक्ती) हे मनपा कार्यालयात २२.१०.२००१ ते दिनांक १४.०१.२००४ पर्यंत सहाय्यक संचालक नगर रचना म्हणुन कार्यरत** होते त्यांचे कार्यरत कालावधी मधील सेवानिवृत्ती अंशदान रुपये ३८,१२८/- (अक्षरी रुपये अडतीस हजार एकशे अठावीस फक्त) व रजा वेतन अंशदान रुपये ३३,४१४/- (अक्षरी रुपये तेहत्तीस हजार चारशे चौदा फक्त) असे **एकूण रुपये ७१,५४२/-** (अक्षरी रुपये एकाहत्तर हजार पांचशे बेचाळीस फक्त) ला प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात आली **त्याची नोंद घेणे बाबत**.

स्वाक्षरीत/-
**सभापती, स्थायी समिती**
नांवाशमनपा, नांदेड.

स्वाक्षरीत/-
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

,